माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावर परवानगी देणे बाबत

ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः इंमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २९ सप्टेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-१०१०/(१४६/२०१०)/ प्राशि-३, दिनांक २८/०५/२०१०

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२/२०११)/ प्राशि-३, दिनांक २५/०९/२०१२

३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२, दिनांक ०४ जानेवारी, २०१३

४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२ (दुसरी सुधारणा) अधिनियम २०१३, दिनांक ०२ जुलै, २०१३

५) शासन आदेश, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२ अ/११)/ प्राशि-३, दिनांक ३०/०८/२०१३

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), नियम, २०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६

७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. इंमाशा-१७१४/ प्र.क्र.२५०/एसएम-२, दिनांक ३१ मे, २०१७

८) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिस-२०१७/नखाप्राशा/इंशामा२०१०-११/७१११/प्रशा-५१३, दि. २०.०९.२०१७

प्रस्तावना -

शासनाने संदर्भाधिन क्र. (१) येथील दिनांक २८ मे, २०१० च्या परिपत्रकान्वये इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील खाजगी संस्थांमार्फत प्राथमिक शाळा सुरू करण्याचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ७४७५ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीने केल्यानंतर राज्यस्तरीय समितीने प्राथम्यक्रम ठरवून ३११५ ठिकाणी शाळा सुरू करण्याच्या शिफारशी केलेल्या होत्या. सदर ३११५ शाळांचे प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेल्या

कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
ण उपसंचालक, पुणे विभाग

93 132 118

... ३११५ शाळांच्या प्रस्तावामधील शाळांना परवानगी देण्याकरिता संदर्भाधीन क्र. (२) दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात आले होते. या निर्णयातील तरतुदीनुसार उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करुन पात्र ठरणाऱ्या ७५५ शाळांचा व शिक्षण संचालक(प्राथमिक),पुणे यांनी शासनास सादर केला होता.

दरम्यान, राज्यात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २ दिनांक ०४ जानेवारी, २०१३ पासून अंमलात आला. त्यामुळे सदर अधिनियम अंमलात पूर्वी जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेले सर्व अर्ज रद्द करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधिन क्र. येथील दिनांक ३० ऑगस्ट, २०१३ अन्वये घेतला. तथापि, बऱ्याच संस्थांनी त्यांच्या शाळांना म विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळेल या आशेने शाळा सुरु केलेल्या आहेत.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु असल्याने सद्यस्थितीत कायम विना अनुदान तत्वावर शाळांना परवानगी देण्याचे धोरण नाही. कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस परवानगी म्हणजे कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही व ंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्यात येणाऱ्या शाळांनादेखील कोणतेही अनुदान केव्हाही नाही हेच सुत्र लागू आहे. शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा यम विना अनुदान तत्वावर सुरू करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं सहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम, २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन १० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून काही त्यानंतर राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा ह्या बहुतांशपणे शहरी गा- आहेत. सदर शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे ...ड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत हेत. या सर्व बाबी विचारात घेता, सन २०१० पासून सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक ाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

ासन निर्णय:-

सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रात नमुद करण्यात आलेल्या ५७ प्राथमिक शाळा (इयत्ता १ ली ते ५ वी, इंग्रजी माध्यम) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. सदर शाळांनी खालील अटी व शर्तींचे

I) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतूदीनुसार शाळेसाठी पक्की इमारत व आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांची पूर्तता करणे आवश्यक राहील. भौतिक सुविधांची पूर्तता होत नसल्यास त्याची पुर्तता ६ महिन्याच्या कालावधीत करणे आवश्यक राहील. याबाबतची जबाबदारी; संबंधित शाळांच्या संस्थाचालकांवर राहील.

II) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले व यापूढे विहित करण्यात येणारे आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इत्यादींचे पालन करणे बंधनकारक राहील.

III) संबंधित शिक्षण संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत (जिल्हा परिषद/महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमत: आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता देण्यात येईल.

IV) शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

V) सोबतच्या यादीतील शाळेबाबत किंवा संबंधित संस्थेबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी अथवा आर्थिक अधिनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

२. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

३. उपरोक्त बाबींची पूर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आता प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा त्यानुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांचे पूर्तता होत किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणाऱ्या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

४. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(134) ९५ (179)

134

डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा बाबत
ए U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती
,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन
देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी
प्रकल्प संचालक, **महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल अधिकारी म्हणून
करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "
अर्थसहाय्यित तत्वावरील 'परवानगी प्राप्त नवीन शाळा' असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर
वर लावणे आवश्यक राहील.

परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व
पध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील
व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक
ील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वा.म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

तं.

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचे खाजगी सचिव
४. आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. **शिक्षण संचालक**, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. **शिक्षण संचालक**, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. **सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक**
९. **सर्व शिक्षणाधिकारी** (प्राथमिक/माध्यमिक)
१०. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवडनस्ती (एसएम २).

शासन निर्णय क्रमांकः इंमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम- २, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ सोबतचे सहपत्र

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | शाळेचा प्रकार |
| १ | पुणे | साई प्रसाद शिक्षण संस्था जळोची, ता. बारामती जि. पुणे | डॅफोडिल्स इंग्लिश मिडीयम स्कूल, जंक्शन (आनंदनगर) ता. इंदापूर, जि. पुणे | प्राथमिक |
| २ | पुणे | सरस्वती हॅपी चिल्ड्रन्स स्कूल, | सरस्वती हॅपी चिल्ड्रन्स स्कूल, माऊली सोसायटी, साई पार्क, दिघी, पुणे | प्राथमिक |
| ३ | पुणे | अभिमन्यु चौधरी फौंडेशन इंद्रायाणीनगर, भोसरी, पुणे | ब्रिलियंट सिटी पब्लिक स्कूल, धावडेवस्ती, भोसरी | प्राथमिक |
| ४ | पुणे | श्री. नारायणगाव गुरु समिती, | गुरु नारायणगाव विद्यालय, गहुंजे, साईनगर, ता. मावळ, जि. पुणे | प्राथमिक |
| ५ | पुणे | माँ. दुर्गा शक्ती महिला संस्था, कोंढवा, पुणे | किडस आर कीड्स नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल कोंढवा, पुणे | प्राथमिक |
| ६ | सातारा | प्रज्ञा एज्युकेशन सोसायटी, मस्करवाडी (भोंदवडे), ता.जि. सातारा | गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल, भोंदवडे, ता.जि. सातारा | प्राथमिक |
| ७ | कोल्हापूर | ज्ञानकला शिक्षण संस्था, कोल्हापूर | ज्ञानकला इंग्लिश मेडियम स्कूल, उचगांव ता. करवीर, जि. कोल्हापूर | प्राथमिक |
| ८ | कोल्हापूर | ज्ञानहो विद्यामंदिर शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर | ज्ञानहो विद्या मंदिर इंग्लिश मेडियम स्कूल, कोल्हापूर | प्राथमिक |
| ९ | नांदेड | अभिनव भारत जनविकास प्रतिष्ठाण, नांदेड | स्वामी विवेकानंद स्कूल ऑफ स्कॉलर्स, मगनपूरा, आनंदनगर, नांदेड | प्राथमिक |
| १० | नांदेड | अभिनव भारत जनविकास प्रतिष्ठाण, नांदेड | विवेकानंद पब्लिक स्कूल, दिलीपसिंग कॉलनी, गोवर्धन घाट वजिराबाद, नांदेड | प्राथमिक |
| ११ | नांदेड | महात्मा वस्वेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था हाणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड | यशोदिप इंग्लिश स्कूल, हाणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड | प्राथमिक |

(136) 90 ~~121~~

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय 16349
दिनांक:- 09 OCT 2017

136

प्रति

अध्यक्ष/सचिव,

श्री नारायणगाव गुरू समिती

विषय - राज्यात सन २०१० मध्ये सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहायय तत्वावर परवानगी (इरादा पत्र) देणेबाबत.

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.
३. शासन निर्णय इमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. २९.०९.२०१७

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवुन इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासुन राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा ह्या बहुतांशपणे शहरी भागात आहे. त्यामुळे सदर शाळांना स्वयं अर्थसहायय तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवुन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींची पुर्तता करणा-या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयं अर्थ सहायित तत्वावर विशेष बाब म्हणुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासुन आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी (इरादा पत्र) दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ४ | पुणे | श्री नारायणगाव गुरू समिती | गुरू नारायणगाव विद्यालय, गहुंजे, साईनगर, ता. मावळ, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक इ. १ ली ते ५ वी | २०१७-१८ |

अटी व शर्ती :-

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ मधील तरतुदीनुसार शाळेसाठी पक्की इमारत व आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांची पुर्तता करणे आवश्यक राहील. भौतिक सुविधांची पुर्तता होत नसल्यास त्याची पुर्तता ६ महिन्याच्या कालावधीत करणे आवश्यक राहील याबाबतची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील. यामध्ये खेळाच्या मैदानासाठी लागणा-या जागेची अट क्र.२ च्या अटीच्या अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे.

२ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसुचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. पालन करणे बंधनकारक राहील

३. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगरपलिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमतः यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.

४. शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसारविद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारनबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

६ उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणा-या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

७. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

८ यु-डायस डाटा- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळाबाबत U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

९. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०. शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. स्वा. नानत, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

महाराष्ट्र/महत्त्वाचे
कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-१/स्वयंअर्थशाळा/मान्यता/पुवि/२०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 26 MAR 2018

प्रति
अध्यक्ष/सचिव,
श्री नारायणराव गुरू समिती

सुधारित आदेश

विषय - राज्यात सन २०१० मध्ये सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावर परवानगी (इरादा पत्र) देणेबाबत.

संदर्भ १-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १.१ व १४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र माध्य-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक १०. जून २०११.
३. शासन निर्णय स्वमाप्र-१७१४/प्र.क्र.१५०/एसएम-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. २९.०९.२०१७
४. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. शिउसं/स्वयंअर्थशाळा/मान्यता/पुवि/२०१७/७३५१ दि ०९.१०.२०१७

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय क्र. ३ दि. २९.०९.२०१७ नुसार पुणे जिल्ह्यातील एकुण ५ शाळांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर शाळा सुरु करण्यास शासनाने परवानगी देण्यात आली होती, त्यानुसार या कार्यालयाच्या संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये आपल्या संस्थेला याबाबत कळविण्यात आले होते, परंतु या कार्यालयाच्या संदर्भीय पत्रामधील अट क्र. १ मधील अंतिम परिच्छेद मध्ये अनावधानाने टंकलेखन चुकीमुळे "यामध्ये खेळाच्या मैदानासाठी लागणाऱ्या जागेची अट क्र २ च्या अटीच्या अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे." ही अट रद्द करण्यात येत आहे. असे नमुद करण्यात आले होते. परंतु मुळ शासन निर्णयात वरील अट नमुद नसल्यामुळे या कार्यालयाच्या संदर्भीय पत्र अधिक्रमित करुन पुढील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ४ | पुणे | श्री नारायणराव गुरू समिती | गुरू नारायणराव विद्यालय, गहुंजे, कार्लगार, ता. मावळ, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक इ. १ ली ते ५ वी | २०१७-१८ |

अटी व शर्ती :-

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ मधील तरतुदीनुसार शाळेसाठी पक्की इमारत व आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांची पूर्तता करणे आवश्यक राहील. भौतिक सुविधांची पूर्तता होत नसल्यास त्याची पूर्तता ६ महिन्याच्या कालावधीत करणे आवश्यक राहील याबाबतची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील.
२ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. पालन करणे बंधनकारक राहील
३. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषद/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे असा करारपत्राची प्रत प्रथमतः यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.
४. शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसारविद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.
५. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.
६ उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकपासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणाऱ्या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.
७. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.
८. पू-उपरोक्त अट- या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांबाबत U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.
९. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
१०. शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.
प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा. उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

138 e 125 138

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळसमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/२०१८-१९/ ४९७७

दिनांक - 4 JUN 2018

प्रति,

अध्यक्ष/सचिव
श्री नारायण गुरू समिती

विषय:- राज्यात सन २०१० मध्ये सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावर सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून दिलेल्या परवानगीबाबत

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक इमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई दि २९.०९.२०१७

२. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. शिउसं/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७/७३५० दि ०९.१०.२०१७

३. या कार्यालयाचे सुधारित आदेश जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७/२२०८ दि २६.०३.२०१८

४. शासन शुध्दीपत्र क्रमांक एसएफएस-१०१०/प्र.क्र. ६५७/एसएम-२ दि १६.०५.२०१८

## शुध्दीपत्र

या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्रं. २ व ३ पहावे. त्यामध्ये रकाना क्र. ३ मध्ये मान्यता मिळालेल्या संस्थेचे नाव श्री नारायणगाव गुरू समिती ऐवजी श्री नारायण गुरू समिती व रकाना क्रंमाक-४ मध्ये शाळेचे नाव गुरू नारायणगाव विद्यालय, गहुंजे, साईनगर, ता. मावळ, जि. पुणे ऐवजी श्री नारायण विद्यालय, गहुंजे, साईनगर, ता. मावळ, जि. पुणे असे वाचावे.

२. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा/ दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक २६.०३.२०१८ च्या पत्रातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा. उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
मा शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रत :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे

(139)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/ 450/2020
पुणे 1 दिनांक :- 8 / 10/2020

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,

श्री नारायण गुरु समिती संचलित श्री नारायण विद्यालय गहुंजे साईनगर ता मावळ जि.पुणे

विषय:- सन 2015- 16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013

2.शासन निर्णय क्रमांक जा.क्र. इंमाशा1714/ प्र क्र 250/ एसएम 2 दिनांक 29/9/2017

3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.शिउंस/ प्राथ1 स्वयंशाळा मान्यता पुवि 2017/2208 दिनांक 26/3/2018

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ. 1 ली ते इ.5 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | श्री नारायण गुरु समिती | श्री नारायण विद्यालय गहुंजे साईनगर ता मावळ जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक इ.1 ली ते इ.5 वी | २०१७-१८ |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

4.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन 2018-19 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

7..महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

8. शासन निर्णय क्र. एसएसएफ/प्र.क्र.735/एसएम-2, दिनांक-6.8.2013 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.

9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

11. संदर्भ क्र2 च्या शासन नियम अट क्र 3 ची पुर्तता कायम पुर्ण करणेच्या अटिस अधिन राहून प्रथम मान्यता देणेत येत आहे .

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.

2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1

3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.